# विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा :** विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेले विजुगीषी प्रवृत्ती, सोशल मीडियाचा वाढता प्रभावामुळे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना आपल्या ध्येयापासून दूर जाताना आढळा आहे. परिणामी महाविद्यालयीन विद्यार्थिनींची छेड काढणे आदी प्रकारांमुळे या पथकाची निर्मिती करण्यात आली आहे.

मुलींना असुरक्षिततेची भावना जाणवू लागल्यामुळे महाविद्यालयाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे निर्भया पथक स्थापन केले आहे. या पथकातील मुलींची नावे सुरक्षेच्या कारणास्तव गोपणीय ठेवण्यात आली आहे. या पथकाला उपविभागीय पोलीस अधीक्षक पी.टी. सपकाळे, महिला हे.कॉं.मराठे, ॲड.एस.पी. गवारे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव ए.के. पटेल, प्राचार्य डॉ.एस.डी. पाटील, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.जे.जे. पाटील, एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे के.जे. अनपट, प्रा.तमखाने तर विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील प्रा.हर्षा पटेल, सुवर्णा पटेल, मयुरी पाटील, युगंधरा पाटील, ललिता पाटील, प्रा.दीपक पाटील उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा.भूषण निकम यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रा.सोनाली पाटील, हर्षा पटेल यांनी पथक स्थापनेसाठी विद्यार्थिनींना प्रेरित केले होते.

# पोलीस कर्मचाऱ्यांसाठी रक्षाबंधन

■ बामखेडा । वार्ताहर-

शहादा येथील. विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पोलीस कर्मचाऱ्यासाठी रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शहादा येथील श.ता.को.ऑप.एज्युकेशन संस्थेच्या विज्ञान वरीष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. आज येथील पोलीस उपाधीक्षक कार्यालयात स्वातंत्र्य दिन व नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थिनीनी घरापासून दूर असलेले पोलीस कर्मचाऱ्यांना एकांत वाटू नये व कर्तव्य बजावत असताना महाविद्यालयीन तरुणींमधील पोलीसांब़द्दलची आदरयुक्त भिती कमी व्हावी व स्नेहभाव वृद्धीगत व्हावा, ह्या उद्देश्याने राष्ट्रीय सेवा योजना व निर्भया पथकातील विद्यार्थिनींनी येथील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे औक्षण करून राखी बांधून ह्या बंधू रायास संरक्षणाची जबाबदारी सोपवली. यावेळी प्रामुख्याने वाहतूक, एल.सी.बी. व विविध विभागातील सर्व पोलीस कर्मचारी ,अधिकारी उपस्थित होते. डी.वाय.एस.पी.पुंडलिक सपकाळे यांनी विद्यार्थीनीचे अभिनंदन केले . हा रक्षाबंधन सर्वच विद्यार्थिनींकरीता एक आगळा वेगळा क्षण होता, अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.भूषण निकम यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष हिरालाल पाटील, सेक्रेटरी ए.के.पाटील, प्राचार्य डॉ. एस.डी.पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



# दीपस्तंभच्या प्रेरणा अभियान परीक्षेचे निकाल जाहीर

नंदूरबार। दि. ४ (वार्ताहर)

खान्देश स्तरावर घेण्यात आलेल्या दीपस्तंभ आत्मविश्वास व प्रेरणा अनुभुती अभियान परीक्षेचे निकाल शिक्षक दिनानिमित्त जाहीर करण्यात आले. नंदुरबार जिल्ह्यातील २९ शिक्षकांनी प्रथम दीडशे शिक्षकांमध्ये स्थान पटकावले आहे.

जुलै महिन्यात घेण्यात आलेल्या या परीक्षेत चार हजारापेक्षा जास्त शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. यात खान्देश स्तरावर प्राथमिक गटात प्रथम क्रमांक जयश्री पवार (अमळनेर), माध्यमिक गटात प्रणिता झांबरे (जळगाव) आणि महाविद्यालयीन गटात योगेश इंगळे (जळगाव) यांनी पटकावला.

नंदुरबार जिल्ह्यातील यशस्वी शिक्षक पुढीलप्रमाणे-

प्राथमिक शिक्षक गट - रमेश चौधरी, विजय गिरासे, रुक्मिणी इथवे, सुदाम गोसावी, मनोज पाटील (शहादा), अनंतकुमार सुर्यवंशी (नंदूरबार), कल्पना अलोणे, नरेंद्र खैरनार, कविता खैरनार, अमोल कांबळे (नवापूर)

माध्यमिक शिक्षक गट- महेंद्रसिंग राजपूत, पुष्पांजली कोळी, अनंतकुमार मोरे, अनंतकुमार बच्छाव, आर.टी.पाटील, प्रतिभा निंबोलकर, सुनिल कुंवर, माधुरी देसले, योगेश पाटील (शहादा), अनिल निकुंभ, स्वप्रिल सोनार, योगेश बागुल, स्वाती महाजन, चेतना चौधरी (नंदुरबार) महादेव होलगे प्रमोद सोनवणे (तळोदा), संदीप पाटील (धडगांव), योगिता पाटील (नवापूर)

उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन गट- भूषण निकम (नंदुरबार)

पहिल्या १५० विजेत्या शिक्षकांची शैक्षणिक सहलीसाठी निवड करण्यात आली आहे. नंतरच्या ६०० शिक्षकांची पुस्तक भेटीसाठी निवड झाली आहे.

सविस्तर निकाल 'दीपस्तंभ' च्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले आहे.

लोकमत (बुधवार)
५ सप्टे २०१८

# विज्ञान महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा :** शहरातील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबच्या अनुषंगाने एड्स आजाराबाबत नागरिकांमध्ये असलेली मतभिन्नता लक्षात घेऊन जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयातील १५ जणांचा एक क्लब स्थापन करण्यात आला. याप्रसंगी त्यांना विविध मार्गदर्शनपर प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचा वापर करीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात व सार्वजनिक ठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम सादर करून या आजाराबाबत असलेली भीती व गैरसमज दूर करावी या उद्देशाने या गटाची स्थापना करण्यात आली आहे.

याप्रसंगी आरोग्य विभागाचे नितीन मंडलिक, विश्वास सूर्यवंशी, गणेश कासार व अमोल सोनवणे उपस्थित होते. या मान्यवरांनी एड्सविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.एस.डी. पाटील उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा.भूषण निकम यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी मराठे तर आभार प्रा.सोनाली पाटील यांनी मानले. यासाठी शिवराय शेलार, भूषण भोई, दर्शना जमदार, भूषण गमे, शुभम पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# सर्व धर्म समभाव समतेचा संदेश देणारे रासेयो शिबीर

शहादा दि.३० (प्रतिनिधी) : येथील श.ता.को. ऑप एज्यु. सोसा. लि. वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर नुकतेच संपन्न झाले. शिबीरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शतकोत्सवी वर्षानिमित्ताने समता व सर्वधर्मसमभाव या प्रकल्पाचा समावेश करण्यात आला होता.

शिबीरात विविध धार्मिक गट विभागणी करुन धर्म संस्थापकाची माहिती व सण उत्सव साजरे करण्यात आल्याने सहभागी विद्यार्थी-विद्यार्थीनींना सर्व धर्मीयांचा परमेश्वर एक आहे याचा संदेश दिला. तसेच गावातून सद्भावना रॅली काढण्यात आली. या रॅलीत धार्मिक गीते म्हणण्यात आली. तसेच शिबीरातील विद्यार्थ्यांनी सर्व धर्माच्या पोशाख परिधान करुन शिबीरात वावरत असल्याने सर्व धर्मियांचा पोशाख व त्यांच्या चालीरिती समजण्यास मदत होत होती. विविध ज्वलंत विषयावर तब्बल १८ पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. दरम्यान, विद्यापीठामार्फत नियुक्त शहादा विभागीय रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. मृणाल जोगी व जिल्हा समन्वयक डॉ. अविनाश निकम यांनी शिबीरस्थळी भेट देवून गौरवोद्गार काढले. कार्यक्रम अधिकारी भुषण निकम यांनी कौतू केले आहे. संस्थेतर्फे मानद सचिव ए. के. पटेल यांनी शिबीरास विशेष भेट देवून मार्गदर्शन केले.

समारोपीय कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पाटील, जि. प. सदस्य अभिजित पाटील, मानद सचिव ए. के. पटेल, प्राचार्य नयना कुलकणी, प्रभारी प्राचार्य काकासाहेब अनपट, पोलिस पाटील प्रमोद चौधरी, जि. प. मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, ज्येष्ठ नागरिक बधुलाल चौधरी, राजाराम चौधरी आदींची उपस्थिती होती. सुत्रसंचलन विनय पटेल, मयुरी पाटील यांनी तर प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम यांनी केले. आभार सोनाली पाटील व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी हर्षल खैरनार यांनी केले. शिबीर यशस्वीतेसाठी प्रा. सविता पाटील, गणेश पाटील प्रयत्न केले.

आपला महाराष्ट्र ३१ डिसेंबर २०१५ (गुरुवार)

# दुर्गम भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या प्रवाहात

## विशेष योगदान : शहाद्याच्या प्रा. निकम यांचा गौरव



जळगाव : स्पर्धा परीक्षेचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रा. भूषण निकम यांचा गौरव करताना न्यू आर्टस, सायन्स, कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जावरे. शेजारी प्राचार्य डॉ. राणे, सत्यजित साळवे, एस. एन. पाटील, जयंत लेकूरवाळे आदी.

**सकाळ वृत्तसेवा**

बामखेडा, ता. ३० : सातपुड्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेच्या प्रवाहात येत आहेत. त्यांना यात आणण्यासाठी शहादा येथील शहादा तालुका को. ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा केंद्राचे प्रा. भुषण निकाम यांचा स्पर्धा परिक्षा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जळगाव येथे गौरव करण्यात आला.

शहादा येथील शहादा तालुका को. ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा विभागांतर्गत वर्षभरात झालेल्या विविध परिक्षा त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय व राज्यस्तरावर या प्रकाराचा महाराष्ट्र लोकसेवा आयोग धर्तीवरील परिपूर्ण असलेल्या परीक्षांचे या विभागामार्फत वेळोवेळी आयोजन केले जाते. या परिक्षांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यातील यश पाहता ग्रामीण आदिवासी बहुल भागात चाललेल्या या केंद्राचा प्रचार व प्रसार विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरला आहे. त्यामुळे अनेक वेगवेगळ्या परिक्षांची माहिती होण्यास मदत मिळत असते. नुकतीच महाविद्यालयात जिज्ञासा फाऊंडेशन पुरस्कृत राज्यस्तरीय परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या परीक्षेचे नंदुरबार जिल्ह्याचे समन्वयक म्हणून प्रा. भुषण निकम यांनी कार्यभार स्वीकारून नंदुरबार ते थेट धडगाव पर्यंत ही परिक्षा यशस्वी करुन अनेक विद्यार्थ्यांना या परीक्षेच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले. तसेच येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातून जिल्ह्यात प्रथम, द्वितीय व शहादा तालुक्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाच्याच विद्यार्थिनींनी बाजी मारली. त्यांना अनुक्रमे २५०० रुपये, दोन हजार व ५०० रुपये रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देण्यता आले. असे आगळे वेगळे कार्य ग्रामीण भागात केल्याने व स्पर्धा परीक्षांचे महत्व लक्षात घेता विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कार्याकडून प्रा. भुषण निकम यांना न्यू आर्ट्स, सायन्स, कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जावरे यांच्या हस्ते बी. डी. बेंडाळे महाविद्यालय जळगाव येथे स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र देवून गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. राणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी सत्यजीत साळवे, एस. एन. पाटील, राज्य समन्वयक जयंत लेकूरवाळे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष जयदेव पाटील, सचिव डॉ. विलास पटेल, प्राचार्य ए. के. पटेल, प्राचार्य नयना कुलकर्णी यांनी समाधान व्यक्त केले.


सकाळ ३१ मार्च २०१५ (मंगळवार)

# शहाद्यात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे रस्ता सुरक्षा सप्ताहात जनजागरण

आ. महाराष्ट्र १० डिसें २०१३ (मंगळवार)

शहादा (का.प्र.) : येथील श.ता.को.ऑप.एज्यु. सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रस्ता अपघात अकाली मृत्यू मुखी पडणाऱ्या युवा वर्गाची संख्या लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या रस्ता सुरक्षा जागृती अभियानाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अभियानातील जनजागृतीच्या प्रयत्नाना अधिक गती मिळावी या हेतूने दि.१ते०७डिसेंबर या कालावधीत रस्ता सुरक्षा व सुरक्षीत वाहतुक सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यात सुरक्षा वाहतुक उपक्रमांतर्गत महाविद्यालयात पोस्टर्स स्पर्धा, हेल्मेटचे पुजन तसेच रस्ता सुरक्षीतेच्या जनजागृतीसाठी रॅली, व्याख्याने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. पोस्टर्स स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुरक्षीत वाहतुकीविषयी विविध पोस्टर्स सादर केलेत. रस्ता सुरक्षतेतेसाठीचे नियम व नियमांच्या अंमलबजावणीबाबत शहादा पोलिस स्टेशनचे वाहतुक विभागीचे ए.एस.आय. हरीभाऊ चौधरी, पोलिस कॉं. विलास पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी हेल्मेट पूजन प्रा. ए. के. पटेल, प्रा. नयना कुलकर्णी, जितेंद्र गिरासे व पो.कॉं. रघुनाथ मराठे यांनी केले. तसेच रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस. सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम, शिक्षकेत्तर कर्मचारी राहुल पाटील, किशोर पाटील, राकेश पाटील यांनी सहकार्य केले.



लोकमत दि. ११ जाने २०१३ (बुधवार)

ईश्वर पाटील

# रस्ता सुरक्षा सप्ताहांतर्गत शहाद्यात जनजागृती रॅली




**जनजागृती :** शहादा येथे रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करताना हरिभाई चौधरी. सोबत प्रा.ए.के. पाटील, प्रा.भूषण निकम आदी.

**शहादा :** रस्ता सुरक्षा व सुरक्षित वाहतूक सप्ताहानिमित्त शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीत प्रा.ए.के. पटेल, कार्यक्रम अधिकारी प्रा.नयना कुलकर्णी, प्रा.भूषण निकम, वाहतूक शाखेचे जमादार हरिभाई चौधरी सहभागी झाले. रॅलीसाठी पो.कॉ. रघुनाथ मराठे, जितेंद्र चौधरी, राहुल पाटील, किशोर पाटील, राकेश पाटील आदींनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

१६ जाने १४ लोकमत

# राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा

शहादा- शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित केली आहे. त्यात महाविद्यालयातील १९४ विद्यार्थी व बामखेडा येथील २८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. राज्यस्तरीय परीक्षेत सर्व जिल्ह्यातून केवळ शहादा महाविद्यालयानेच सर्वाधिक स्पर्धक नोंदविले. केंद्र समन्वयक डॉ.लेकुरवाळे, प्रा.भूषण निकम यांनी संयोजन केले. प्राचार्य आर.डी.पाटील. प्रा.ए.के.पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# रासेयोच्या विद्यार्थ्यांकडून वाहतुकीबाबत जनजागृती

## शहादा : निबंध स्पर्धा, पथनाट्याचे आयोजन

**शहादा :** शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान व वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नागरिकांना स्वरक्षणार्थ रस्त्यावरील नियमांचे पालन कशा पद्धतीने केल्याने आपण स्वत:चे व निरपराध नागरिकांचे प्राण वाचवू शकतो यासंदर्भात जनजागृती करण्यात आली.

रस्ता सुरक्षा अभियान व सुरक्षित वाहतुकीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रस्ता सुरक्षा एक जीवनदायी उपक्रम असून, सुरक्षा ही एक काळाची गरज आदी विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच भित्तीपत्रकांच्या माध्यमातून प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शहरातील विविध प्रभाग, बस स्टॅण्ड, भाजी मार्केट परिसरात पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी शहादा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेविषयी विविध नियमांची माहिती दिली. हे अभियान यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, प्रभारी प्राचार्या नयना कुलकर्णी, प्रा.ए.के. पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. (वार्ताहर)

सकाळ ४।१।१६

# सेवा योजना शिबिरात समता सर्वधर्मसमभाव प्रकल्प

## शहाद्याच्या वरिष्ठ महाविद्यालयातर्फे उपक्रम : विविध पोषाखांच्या माध्यमातून परिचय

**सकाळ वृत्तसेवा**



**कलसाडी (ता. शहादा) : सर्वधर्मसमभाव समतेचा संदेश देणारा पेहराव विद्यार्थ्यांनी सादर केला. समवेत संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील, डॉ. मृणाल जोगी, डॉ. सी. के. सामुद्रे, प्रा. भूषण निकम, प्रा. हर्षल खैरनार, प्रा. सोनाली पाटील आदी.**

बामखेडा, ता. १ : शहादा येथील शहादा तालुका को- ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचा येथे नुकताच समारोप झाला. शिबिरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी वर्षनिमित्ताने समता व सर्वधर्मसमभाव प्रकल्प राबविण्यात आला.

याअंतर्गत महात्मा जलथुष्ठ, येशू मसिहा, गौतम बुद्ध, मोहम्मद पैगंबर, श्री श्वेतांबर, जिजस क्राईस, गुरु नानक अशा प्रकारची गट विभागणी करण्यात आली. धर्म संस्थापकाची माहिती देण्यात आली.

शिबिरातील सर्व सहभागी विद्यार्थी - विद्यार्थिनींनी यात सहभाग घेतला. गावात सर्वधर्मसमभावाची शोभायात्रा काढण्यात आली. शिबिरातील विद्यार्थी विविध जाती-धर्माचा पोशाख परिधान करून सहभागी झाले होते.

गावात विविध विषयावर १८ पथनाट्यांसह सांस्कृतिक कार्यक्रम झाले. प्राणायाम, वेदमंत्रे, भारतीय व्यायाम, सूक्ष्म व्यायाम यांचे नियोजन करण्यात आले. कलसाडी येथील आरोग्य केंद्राच्या मदतीने पल्सपोलिओ व इतर आजाराची जनजागृती केली. शिबिरात दरम्यान विद्यापीठामार्फत नियुक्त शहादा विभागीय राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मृणाल जोगी व जिल्हा समन्वयक डॉ. अविनाश निकम यांनी भेट दिली.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पाटील, जिल्हा परिषदेचे सदस्य अभिजित पाटील, मानद सचिव ए. के. पटेल, प्राचार्य नयना कुलकर्णी, प्राचार्य काकासाहेब अनपट, पोलिस पाटील प्रमोद चौधरी, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, बधुलाल चौधरी, राजाराम चौधरी उपस्थित होते.

विनय पटेल यांनी सूत्रसंचालन केले. मयूरी पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. भूषण निकम यांनी आभार मानले. महिला कार्यक्रम अधिकारी सोनाली पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी हर्शल खैरनार, प्रा. सविता पाटील, गणेश पाटील यांनी संयोजन केले.





# विज्ञान महाविद्यालयात उद्या सामान्यज्ञान स्पर्धा

**शहादा, दि.२ (वार्ताहर)-** येथील शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात ४ जानेवारी रोजी राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजित केली आहे.

उ.म.वि. संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राने भारतीय विद्यापीठ पुणे यांच्याशी संलग्नित यशवंतराव कॉलेजने सामन्यज्ञान परीक्षेचे आयोजन केले आहे. त्याकरिता विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय शहादा, जि.नंदुरबार येथे केंद्र असल्याने चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे केंद्रप्रमुख प्रा.भूषण निकम यांनी सर्वतोपरी परीक्षेच्या नियोजनासाठीचे आयोजन केले आहे. परीक्षेसाठी राज्यातील ७० विद्यार्थी सहभागी होत आहेत. मंगळवार, ४ जानेवारी रोजी स्पर्धा परीक्षा होत आहे.

परीक्षेचा निकाल ह्याच विद्यापीठातून घोषित करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना चालनाच मिळेल असा आशावाद चेअरमन मोतीलाल पाटील यांनी व्यक्त केला.



❋ शहादा येथील श.ता.को.ऑप एज्यु सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व महिला महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत सहभागी झालेले विद्यार्थी, समवेत पर्यवेक्षक प्रा.जी.एन.पाटील, प्रा. भूषण निकम, प्रा.जयश्री, प्रा.नेहा, प्रा.कोकणे, प्रा.वानखेडे, प्रा.अनिल जगदाळे (छाया-उमाकांत फोटोज, शेल्टी)

देशदूत १५ ऑक्टो २००८

# शहादा वरिष्ठ महाविद्यालयात
# ान्य क्षमता चाचणी

शहादा (प्रतिनिधी)-येथील हादा तालुका को.ऑपरेटीव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आठवड्यातुन एक याप्रमाणे सामान्य क्षमता चाचणी घेण्यात येत आहे. यासाठी संस्थेचे चेअरमन, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ए.के. पटेल यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे आगामी दिवसात येथे स्वतंत्रपणे स्पर्धा केंद्राची स्थापना करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

१२०८ देशदूत

# विज्ञान महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा

शहादा : शहादा तालुका को.ऑप.एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

केंद्रावर कै.सौ.जी.एफ. पाटील कनिष्ठ विद्यालय शहादा, पूज्य साने

◆ या परीक्षेमुळे राज्य सेवा व तत्सम प्रकाराच्या परीक्षांबद्दलची भीती कमी होण्यास मदत मिळाली.

गुरुजी मंडळाचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, सिनियर महिला महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ही परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आधारावर घेण्यात आली. यशस्वितेसाठी स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख व नंदुरबार जिल्हा समन्वयक प्रा.भूषण निकम यांनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

# वसंतराव नाईक महाविद्यालयात व्याख्यान

शहादा : शहरातील वसंतराव नाईक वरिष्ठ महाविद्यालयात युवा दिनानिमित्त प्रा.भूषण निकम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रा. निकम यांनी युवक कसा घडेल याबाबत मार्गदर्शन केले.

या वेळी प्रा. निकम यांनी आत्मसंयम, त्याग, साधना, योगाभ्यास, आत्मविश्वासातील दृढता, सरलता, अध्यात्मातून विकास, दूरदृष्टी, मनोनिग्रह, संकल्पसाधना, उदारमतवाद, अंतरात्मा, धारिष्ट्य, योग ध्येयप्राप्ती, ब्रह्मचर्यातून साधना व प्राप्ती यासह विविध विषयांवर मार्गदर्शन केले. प्रसंगी उपप्राचार्य रवींद्र मराठे, प्रा.कोमलसिंग पाटील, प्रा. मालिनी आढाव आदींची उपस्थिती होती. (वार्ताहर)

लोकमत नंदुरबार, गुरुवार, दि. १५ जानेवारी २०१

लोकमत दि. १९ जाने २०१२

# राष्ट्रस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा शहादा महाविद्यालयात

शहादा । दि.१५

शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात पुणे येथील भारती विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील सामान्यज्ञान स्पर्धा घेण्यात आली. यात विविध महाविद्यालयांमधील ११६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

ही परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर आधारित असून, आयोगाच्या आकृतीबंधाप्रमाणे नियोजन करण्यात आले . परीक्षेचे आयोजन स्पर्धा परीक्षा विभागाचे केंद्रप्रमुख प्रा.भूषण निकम यांनी केले.

## उत्तर महाराष्ट्रातील दुसऱ्या केंद्राचा मान

उत्तम नियोजनाबद्दल प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस.एन. चौधरी, प्रा.ए.के. पटेल यांनी गौरव केला.

या परीक्षेची संपूर्ण भारतात आतापर्यंत फक्त १६ ठिकाणी परीक्षा केंद्रे असून, त्यात उत्तर महाराष्ट्रातील हे दुसरे केंद्र ठरले आहे. विद्यार्थ्यांनी या स्पर्धा परीक्षा केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख प्रा.भूषण निकम यांनी केले आहे.

सकाळ १७ डिसें २०१०

# स्वतःतील कमकुवत, बळकट मुद्दे शोधावेत

## डॉ. उज्ज्वल चव्हाण : शहाद्यात चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

बामखेडा, ता. १६ : "स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी परीक्षार्थींनी स्वतः मधील कमकुवत व बळकट मुद्द्यांचा शोध घ्यावा. त्यामुळे अधिक शक्ती व वेळ घालावी लागत नाही. अभ्यास करावयाचा म्हणजे फक्त पुस्तकाचे वाचन नव्हे; तर त्यासाठी शारीरिक, मानसिक परिपक्वता ही आवश्यक आहे," असे प्रतिपादन धामणगाव (ता. चाळीसगाव) येथील डॉ. उज्ज्वल चव्हाण यांनी येथे केले.



**शहादा : शहादा तालुका को-ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. उज्ज्वल चव्हाण. शेजारी डॉ. एस. पी. गिरासे, प्रा. ए. के. पटेल आदी.**

शहादा तालुका को- ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन नुकतेच झाले, त्या वेळी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील अध्यक्षस्थानी होते. आयएमआरडी विभागाचे संचालक डॉ. एस. पी. गिरासे, प्रा. ए. के. पटेल प्रमुख पाहुणे होते.

डॉ. चव्हाण म्हणाले, की परीक्षेच्या प्रवाहात येण्यासाठी योग्य मार्गदर्शकांचा सल्ला घ्या, म्हणजे मनातील भीती कमी होईल. विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम मला प्रशासनातील अधिकारी व्हायचे, याबाबत मन घट्ट करा म्हणजे यश मिळते. सामाजिक जाणिवतेचेही भान ठेवावे, म्हणजे आपणास क्षेत्राशी पूरकता निर्माण करता येते.

संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील यांनी, स्पर्धा परीक्षांसाठी सर्वतोपरी संस्थेमार्फत मदत करून विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. या वेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. चव्हाण यांनी उत्तरे दिली. त्यात स्पर्धा परीक्षेचे स्वरूप जाणून घेतले. प्रा. एल. एन. चौधरी यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख प्रा. भूषण निकम यांनी सूत्रसंचालन केले.

# 'भविष्याकडे वाटचाल' विषयावर मुख्याधिकारी निकम यांचे व्याख्यान

शहादा, दि.२० (वार्ताहर)- येथील शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा व मार्गदर्शन केंद्रात 'भविष्याकडे वाटचाल' या विषयावर मुख्याधिकारी हेमंत निकम यांचे व्याख्यान झाले.

विद्यार्थ्यांची गरज पूर्ण करून त्यांना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून 'भविष्यकडे वाटचाल करण्यासाठी लागणारी आवश्यकता' या विषयावर नुकतेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेले मुख्याधिकारी हेमंत निकम यांनी स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात मार्गदर्शन केले.

या केंद्रामार्फत नेहमी नवीन उपक्रम राबविले जातात. त्या अनुषंगाने मुख्याधिकारी निकम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एस.एन.डी.टी. महिला कला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन. चौधरी, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ए.के. पाटील, कार्यालय प्रमुख शरद पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख प्रा.भूषण निकुम यांनी केले तर आभार प्राचार्य ए.के. पाटील यांनी मानले.



■ शहादा येथील वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयात चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित विकास संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, डॉ.उज्ज्वल चव्हाण, प्राचार्य एल.एन. चौधरी, प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील आदी.

# चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे शहादा येथे उद्घाटन

**शहादा, दि.२४-** येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन नुकतेच झाले. संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील अध्यक्षस्थानी होते.

या वेळी धामणगाव ता.चाळीसगाव येथील डॉ.उज्ज्वल चव्हाण यांनी व्याख्यानादरम्यान सांगितले की, ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे व्यासपीठ निश्चितच फायदेशीर ठरेल. तसेच विद्यापीठ व महाविद्यालयाचे त्यांनी कौतुक केले. प्रास्ताविकातून एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन. चौधरी यांनी स्पर्धा परीक्षेचे आव्हान पेलण्यासाठी या मार्गदर्शन केंद्राचा वापर करण्यासंदर्भातील माहिती दिली. विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील यांनी महाविद्यालयाची स्पर्धा परीक्षेतील चाललेली वाटचाल याबाबतचा तपशील सांगितला. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रप्रमुख प्रा.भूषण निकम यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमात आय.एस.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.एस.पी. गिरासे, प्रा.ए.के. पटेल उपस्थित होते. व्याख्यानात विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरूप जाणून घेतले. यशस्वीतेसाठी चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली व केंद्रातील सर्व उपस्थित विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.

संस्थेचे चेअरमन पाटील यांनी स्पर्धा परीक्षांसाठी सर्वतोपरी संस्थेमार्फत मदत करून विद्यार्थ्यांना सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

लोकमत २७ ऑगस्ट २०१०

# जागृतीच्या कक्षा रुंदावण्याची गरज

## -शहादा येथील स्पर्धा परीक्षा केंद्रात देवीदास पाटील

**शहादा,** दि.२६- विद्यार्थ्यांनी मनातून भीती काढून टाकावी आणि जागरूक राहावे. तसेच प्रशासनात काम करायचे असल्यास स्पर्धा परीक्षेची भीती दूर करावी, असे मत वित्त व लेखाधिकारी देवीदास पाटील यांनी व्यक्त केले.


येथील शहादा तालुका को. ऑपरेटिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात नुकतेच वित्त व लेखाधिकारी पाटील यांनी मार्गदर्शन केले. त्या वेळी ते म्हणाले, महाविद्यालयाच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना फायदा होईल. त्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त करून अभिनंदन केले.

प्रा.भूषण निकम यांनी प्रास्ताविक केले. विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ.गिरासे उपस्थित होते. प्रा.ए.के. पटेल यांनी प्रशासनात जाताना जबाबदारीचे व नैतिक मूल्यांचे भान ठेवावे, असे सांगितले. प्रभारी प्राचार्य एस.एन. चौधरी यांनी अडथळ्यांवर मात करून ध्येयप्राप्ती कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन अमोल पाठक, किरण रोकडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय चेतन सांगळे यांनी करून दिला. आभार पूजा साळी यांनी मानले. यशस्वीतेसाठी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



*विज्ञान महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना देवीदास पाटील. सोबत प्राचार्य एल.एन.चौधरी, प्रा.ए.के.पटेल, प्रा.भूषण निकम.*

लोकमत
HELLO
गुरुवार, दि.२९ जुलै २०१०

■ शहादा येथील शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना संस्थाध्यक्ष मोतीलाल पाटील. सोबत प्रा.ए.के.पटेल, प्रा.भूषण निकम, प्राचार्य एस.एन.चौधरी.

# विद्यार्थ्यांनी बदलण्याची गरज

## स्पर्धा परीक्षा केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मोतीलाल पाटील

**शहादा, दि.२८-** विद्यार्थ्यांनी काळानुरूप बदलण्याची गरज आहे. बदल घडवून आणण्यासाठी स्पर्धा परीक्षेचा आधार घ्यावा, असे आवाहन शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोतीलाल पाटील यांनी केले.

महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी एसएनडीटी महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी, प्राचार्य ए.के.पटेल आदी उपस्थित होते.

प्राचार्य पटेल पुढे म्हणाले, बदल आवश्यक आहे. त्यामुळे विकासाला प्रेरणा मिळते.

प्राचार्य चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व व भविष्यातील वाटचाल यासंदर्भात त्यांनी मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना या परीक्षांकडे वळण्याचेही त्यांनी सांगितले.


संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील यांनी केंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे सांगितले.

तसेच विद्यार्थ्यांनी बदलत्या युगात बदलण्याचे आवाहन केले. याशिवाय नागरिकांसाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या महत्त्वाबाबत माहिती दिली. येणारा काळ विद्यार्थ्यांचा, होतकरू, कौशल्यवान युवकांचा असणार आहे. त्यामुळे आतापासून विद्यार्थ्यांनी तयारीला लागावे. परीक्षांमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. भूषण निकम यांनी प्रास्ताविक केले.

त्यात त्यांनी महाविद्यालयाची घोडदौड, यशस्वी झालेले विद्यार्थी व विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रथम वर्ष शाखेतील केतकी पाठक यांनी केले. आभार कामिनी पाटील हिने मानले.

यशस्वीतेसाठी विद्यार्थी व शिक्षकांनी सहकार्य केले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. लोकमत दि. २४ फेब्रु. २०१४ (सोमवार)




शहादा येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उज्ज्वलकुमार चव्हाण. सोबत एस.एन. चौधरी, पी.आर. पाटील, ए.के. पटे, भूषण निकम.

# स्वत:तील कमकुवत मुद्दे व जमेच्या बाजू लक्षात घ्या

## तयारी स्पर्धा परीक्षेची : उज्ज्वलकुमार चव्हाण

**शहादा :** स्वत:तील जमेच्या बाजू व कमकुवत मुद्दे शोधून त्यानुसार स्पर्धा परीक्षेची तयारी करा, असे आवाहन नाशिक येथील आयकर विभागाचे सहायक आयुक्त डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी येथे केले.

शहादा तालुका को. ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांतर्गत स्पर्धा परीक्षेबाबत डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यात त्यांनी विविध मुद्यांना स्पर्श केला.

आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना स्पर्धेत आणण्यासाठी गेल्या सात वर्षांपासून स्वतंत्र कक्ष स्थापन करून प्रयत्न केला जात आहे. त्या अनुषंगाने येणाऱ्या राज्य सेवा पूर्व परीक्षेची तयारी, एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी व इतर स्पर्धा परीक्षेची रुपरेषा कशी असते याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी डॉ.चव्हाण यांचे व्याख्यान झाले.

या कार्यक्रमादरम्यान डॉ.चव्हाण यांनी स्वत:तील कमकुवत व बळकट मुद्दे शोधून आत्मविश्वास वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले व येणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षा ह्या माझ्यासाठीच आहेत, असा प्रगल्भ आत्मविश्वास स्वत:मध्ये निर्माण करण्याचा गुरु मंत्र दिला. त्यासाठी संस्थेचे चेअरमन मोतीलाल फकिरा पाटील यांनी आपल्या मनोगतातून डॉ.चव्हाण यांच्या यशाबद्दल अभिनंदन करवून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी एस.एन.डी.टी. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन. चौधरी, प्रा.ए.के. पटेल, विद्यार्थी प्रतिनिधी नेहा पाटील उपस्थित होते.

या सत्राचे प्रास्ताविक व केंद्रांची चाललेली वाटचाल केंद्र समन्वयक प्रा.भूषण निकम यांनी माहिती दिली तर कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# स्पर्धा परिक्षेतील कार्याबद्दल प्रा. भुषण निकम यांचा गौरव

आपला महाराष्ट्र २० फेब्रु १३ (बुधवार)



शहादा दि.१९ (का.प्र.) : येथील श.ता.को.ऑप.एज्यु. संस्थेच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. भुषण निकम यांचा नुकताच लेवा एज्युकेशन युनियन संस्था जळगांव यांचे मार्फत विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेसाठी दिशादर्शक कार्य केल्यामुळे जळगांव जि. प. तील माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी शशिकांत हिगोणे यांनी स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र देवून गौरव केला.

सविस्तर वृत्त असे की, नुकतीच येथील महाविद्यालयात राज्यस्तरीय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर सामान्यज्ञान परिक्षेचे आयोजन करण्यात आले. सदर परिक्षेत नंदुरबार जिल्ह्यातून द्वितीय व शहादा तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे असे एकूण चार ही बक्षिसे महाविद्यालयास मिळाल्याने आदिवासी बहुल भागात स्पर्धा परिक्षेच्या रुजवणी मध्ये मोलाचा सहभाग नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेली चेतना व नंदुरबार जिल्ह्यातून प्रथम क्रमांकाचे परिक्षा केंद्र ठरल्याचा बहुमानही महाविद्यालयांसच मिळाल्याने एकंदरीत या स्तूत्य उपक्रमासाठीच्या उत्कृष्ठ कार्याबद्दल जळगांव जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक, एस. जयकुमार, शिक्षण सहसंचालक डॉ. ए.बी. साळी, लेवा एज्युकेशन संस्थेचे सचिव एन. एस. पाटील, राज्य समन्वयक प्रा. जयेंद्र लेंकूरवाळे, जिल्हा समन्वयक, प्रा. सत्यजित साळवे, परिक्षा नियंत्रक प्रा. एल. व्ही. ढाके व जी. डी. बेडांळे महाविद्यालयाचे प्राचार्य एस. एस. राने यांच्या उपस्थितीत शशिकांत हिंगोणे, शिक्षणाधिकारी यांनी ह्या कार्याबद्दल प्रा. भुषण निकम यांचा गौरवचिन्ह देवून अभिनंदन केले. सदर कार्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल यांनी मार्गदर्शन केले तर संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील व संचालक मंडळातील सभासदांनी अभिनंदन केले.

जशीबाई पाटील यांचे

श.ता. को.अ

आपत्काली

# स्पर्धा परीक्षेच्याया कार्याबद्दल प्रा.भूषण निकमांचा सन्मान

पुण्यनगरी ५ एप्रिल १५ (रविवार)



।.को.ऑप.

**शहादा:** येथील श.ता.कोनत विज्ञान एज्युकेशन सोसायटी संचलित भूषण निकम वरीष्ठ महाविद्यालयातील प्रा.भूषणया-खोऱ्यात यांनी धडगांव तालुक्यातील दऱ्या-रपरीक्षांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षक्षासंदर्भात आणले आहे. या विविधं परीक्षास्या कार्याची प्रचार व प्रसार त्यांनी केला. या क्या सन्मान दखल घेत प्रा.निकम यांचा र करण्यात आला. पुरस्कृत

जिज्ञासा फाऊंडेशन पुष करण्यात राज्यस्तरीय परीक्षेचे आयोजन कर जिल्हा आले. या परीक्षेचे नंदुरबार णि निकम समन्वयक म्हणून प्रा.भूषण विव्हापासून यांनी कार्यभार स्विकारला. तेव्हा ही परीक्षा नंदुरबार ते थेट धडगावपर्यंत ही र्थांना स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांना ज्ञान वरीष्ठ परीक्षेच्या प्रवाहात आणले. विज्ञानथम, द्वितीय महाविद्यालयातून जिल्ह्यात प्रथम, । येणाऱ्या व शहादा तालुक्यात प्रथम ये विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाच्याच विद्यार्थ्यांनी बाजी मारली. त्यामुळे स्पर्धा परीक्षेसाठी केलेल्या कार्याची दखल घेत प्रा.भूषण निकम यांना न्यू आर्टस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जावरे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.राणे, उमविचे विद्यार्थी कल्याण अधिकारी सत्यजित साळवे, एस.एन.पाटील, राज्य समन्वयक जयंत लेकुरवाळे उपस्थित होते. या सन्मानाबद्दल प्रा.निकम यांचे संस्थेचे अध्यक्ष मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष जयदेवभाई पाटील, सचिव डॉ.विलास पटेल, प्रभारी प्राचार्य ए.के.पाटील, प्राचार्य नयना कुलकर्णी यांनी कौतूक केले.

[redacted]

# श.ता. को.ऑप विज्ञान महाविद्यालयात आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

शहादा दि.१९ (का.प्र.): येथील श.ता.को.ऑप एज्यु सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दि. २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत विद्यापीठस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी नंदुरबार, धुळे व जळगांव जिल्ह्यातील एकूण ११० महाविद्यालयातील सुमारे ३०० ते ४०० विद्यार्थी सहभागी होतील.

कार्यशाळेसाठी सहभागी विद्यार्थी हा शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ह्या कालावधीत शिक्षण घेत असावा अशा प्रकारची पात्रता ठेवण्यात आली आहे. सदर कार्यशाळेत महाविद्यालयीन युवकांची समाजाप्रती भुमिका व निरनिराळ्या समस्यांमध्ये अथवा संकट काळामध्ये निर्णय क्षमता वाढीला लागणे ही गरज लक्षात घेवून निसर्ग निर्मित संकटांना जसे पूर, आग लागणे, भुकंप तसेच मानव निर्मित दंगली, युध्द या सारख्या आणिबाजीच्या प्रसंगी जिवीत व वित्तहानी (पान ८ वर)

आपला महाराष्ट्र २० फेब्रु २०१४
(गुरुवार)

## आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

पासून संरक्षणासाठी व सकारात्मक कर्तव्याची भावना वाढीस लागण्यासाठी युवकांचा सहभाग महत्त्वपुर्ण असल्याने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी आपात्कालीन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, नगरपालिका शहादा, तहसिल कार्यालय शहादा यांची मदत घेण्यात येणार आहे. तसेच तज्ज्ञ मंडळीचे मार्गदर्शन व विविध आपत्कालीन प्रसंगाचे प्रात्याक्षिके सादर केली जाणार आहेत. डॉ. पंकजकुमार नन्नावरे समन्वयक उमवि जळगांव यांचे मार्गदर्शनात कामकाज सुरु असून त्यासाठी शिबीर समन्वयक प्रा. भुषण निकम व विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. सचिन पाटील, शिबीर संयोजकांची जबाबदारी पुर्ण करीत आहे. त्यास संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

# विज्ञान महाविद्यालय केंद्रात आज सामान्यज्ञान स्पर्धा

शहादा, दि.११ (का.प्र.) श.ता.को.ऑप एज्यु. सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा केंद्रामार्फत राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा जिज्ञासा फाऊंडेशन पूरस्कृत जळगाव यांच्यावतीने रविवार, दि. १३ जानेवारी रोजी महाविद्यालयात घेण्यात येणार आहे.सदर परिक्षेत महाविद्यालय व कै. सौ. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालय मिळून एकूण १७० विद्यार्थी प्रवेशित असून ही परिक्षा १०.०० वा. सदर केंद्रावर घेण्यात येणार आहे. ह्या परिक्षेचे सर्व नियोजन स्पर्धा परिक्षा केंद्र प्रमुख प्रा. भूषण निकम करीत असून त्यासाठी प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल मार्गदर्श करीत आहे.

13 जाने 2013 आपला महाराष्ट्र

# सामान्यज्ञान परीक्षेत विज्ञान महाविद्यालयाचे यश

लोकमत दि. २ एप्रिल २०१८ (बुधवार)

**शहादा :** शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत यश प्राप्त केले आहे.

जळगावच्या जी.डी. बेंडाळे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या परीक्षेसाठी विशेष परिश्रम घेणारे भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा.भूषण निकम यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी डॉ.सानिया नाकाडे, प्राचार्य पी.एच. पवार, प्राचार्य एस.एस. राणे, प्रा.एन.एस. पाटील, . डॉ.आर.डी. वायकोळे प्रा.जे.डी. लेकूरवाळे आदी उपस्थित होते.

या राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेत विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी विनीता मोहन अलोनी हिने जिल्ह्यातून प्रथम, तर कै. जी.एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी ललित माळी, रोहित कुशवाह व अक्षय पाटील यांनी शहादा तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. (वार्ताहर)

१६ जाने २०१८ सकाळ

# शहाद्यात आज सामान्यज्ञान स्पर्धा

लोणखेडा (ता. शहादा), ता. १६ : शहादा तालुका एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागातर्फे उद्या (१७ जानेवारी) सामान्यज्ञान स्पर्धा होईल. परीक्षेसाठी या महाविद्यालयातील २५७, जी. टी. पाटील महाविद्यालय नंदुरबार येथून २३, तळोदा येथून ७५, नाईक महाविद्यालयातून ३८ विद्यार्थी सहभागी होत आहेत. राज्यात एकाच दिवशी ही परीक्षा होईल. प्राचार्या नयना कुलकर्णी, सचिव ए. के. पटेल, केंद्रप्रमुख भूषण निकम आहेत.

# शहाद्यात आज सामान्यज्ञान स्पर्धा

बामखेडा (ता. शहादा), ता. १२ : शहादा येथील शहादा तालुका को.-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्रातर्फे उद्या (ता. १३) जिज्ञासा फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा घेण्यात येणार आहे. शहादा येथील विज्ञान महाविद्यालयात ही स्पर्धा होईल. परीक्षेस महाविद्यालय व (कै.) सौ. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालय मिळून १७० विद्यार्थी प्रविष्ट आहेत. परीक्षा सकाळी दहाला केंद्रावर घेण्यात येणार आहे. परीक्षेचे नियोजन स्पर्धा परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. भूषण निकम करीत असून, त्यासाठी प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील, प्रा. ए. के. पटेल मार्गदर्शन करीत आहेत.



राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत उत्कृष्ट समन्वयक पुरस्कार प्राचार्य एस.एस. राणे यांच्या हस्ते स्वीकारताना शहादा येथील प्रा.भूषण निकम. सोबत एन.एस. पाटील, डॉ.एस.व्ही. ढाके.

लोकमत २९ मार्च १६ (मंगळवार)

# शहादा विज्ञान महाविद्यालयाला 'परीक्षा मित्र' पुरस्कार

**शहादा :** जी.डी. बेंडाळे महाविद्यालय जळगाव यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत येथील शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाने 'परीक्षा मित्र', तर प्रा.भूषण निकम यांना उत्कृष्ट समन्वयक म्हणून पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत नंदुरबार जिल्ह्यातून प्रथम, तालुक्यातून द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसेही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पटकावली.

महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागांतर्गत अशा परीक्षांचे नेहमी आयोजन करून मार्गदर्शन केले जात असते. परिणामी आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्यासाठी मदत होत असते. विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या प्रवाहात आणण्याचे कार्य स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख प्रा.भूषण निकम करीत असल्याने त्यांचाही गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास डॉ.रामप्रकाश, एन.एस. पाटील, जी.डी. बेंडाळे महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एस. राणे आदी उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष हिरालाल पाटील, मानद सचिव ए.के. पाटील, जिल्हा परिषद सदस्य अभिजित पाटील, प्राचार्या नयना कुलकर्णी यांनी गुणवंतांचे कौतुक केले.

(वार्ताहर)

लोकविश्वास टाइम्स

# विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना



नंदुरबार- येथील श.ता.को.ऑप. एज्यु. सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात निर्भया पथकाची स्थापना दैनंदिन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली बिजुगुणी प्रकृती, सोशल मिडीयाचा वाढता प्रभाव या कारणामुळे विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना आपल्या ध्येयापासून दूर जातांना आढळत आहे.परिणामी महाविद्यालयातील विद्यार्थीनींची छेड काढणे, परिसरात सर्रास मोबाईलवर बोलत बसणे, तासिकाकडे लक्ष न देता महाविद्यालयाच्या पायरीवर किंवा कट्ट्यावर बसून राहणे या सर्व घटनांमुळे बाहेरच्या टवाळखोर मुलांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढल्याचे लक्षात आले.

मुलींना असुरक्षिततेची भावना जाणवू लागल्यामुळे महाविद्यालयाने पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने महाविद्यालयातील मुलींचे निर्भया पथक स्थापना केले आहे. सदर पथकातील मुलींची नावे सुरक्षेच्या कारणास्तव गोपनीय ठेवण्यात आली आहे. या पथकाला पोलीस उपअधीक्षक पी.टी. सपकाळे, महिला हेकॉ. मराठे व ॲड. एस.पी.गवारे यांनी मार्गदर्शन केले. कोणताही अनुचित प्रकार महिला किंवा मुलीच्या बाबतीत उद्भवत असेल तर त्यास पोलीस विभागाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे अश्वस्त करुन या पथकातील मुलींचे मनोधैर्य वाढविण्यास मदत केली. या कार्यक्रमावेळी संस्थेचे सचिव ए.के.पटेल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.पाटील, आय.एम.आर.डी. विभागाचे संचालक डॉ.जे.जे.पाटील, एस.एन.डीटी. महाविद्यालयाचे के.जे.अनपट, प्रा.तमखाने, तर विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील प्रा.हर्षा पटेल, सुवर्णा पटेल, मयुरी पाटील, युगंधरा पाटील, ललिता पाटील, प्रा.दिपक पाटील व इतर प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचलन व प्रास्ताविक प्रा.भूषण निकम यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.सोनाली पाटील, हर्षा पटेल आदींनी परिश्रम घेतले.